RID 3131 & रोटरी क्लब ऑफ पुणे मेट्रो व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामती
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

**'मनोरंजन विश्व आणि व्यसनाधीनता' व्याख्यान उपक्रमाचा अहवाल**

गुरूवार दि. २९ जुलै २०२१

दि. २९-७-२०२१ रोजी 'SAY NO' बोलो ना वेबिनार सेरीज एपिसोड नंबर ८ मध्ये 'मनोरंजनविश्व आणि व्यसनाधीनता' या विषयावर श्री. गिरीश कुलकर्णी व चंद्रशेखर फणसाळकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. चंद्रशेखर फणसाळकर यांनी श्री गिरीश कुलकर्णी यांची मुलाखत घेतली. सुप्रसिद्ध अभिनेते गिरीश कुलकर्णी म्हणाले की, 'मनोरंजनविश्व आणि व्यसनाधीनता यांचा जवळचा संबंध आहे. निरीक्षण आणि अनुकरणातून मनुष्य अनेक गोष्टी शिकतो मनोरंजन विश्वाचा वापर व्यसनाधीनता कमी करण्यासाठी करायला पाहिजे. तंबाखूजन्य पदार्थ, ड्रग्ज, सिगरेट, दारू, गांजा, निकोटीन, अल्कोहोल यांच्या सेवनामुळे दुष्परिणामांचा आघात व्यक्तीच्या मानसिकतेवर होतो. व्यसनापासून दूर राहण्याची काळजी घेतली पाहिजे. जाहिरातीत प्रभावी कन्टेन्ट तयार करून या व्यसनांना नकार प्रभावीपणे मांडले जावे. व्यसनी माणसांची स्वतंत्रपणे विचार करण्याची ताकद नष्ट होऊन माणसे दुबळी बनतात. एकेकट्याने राहतात. मूल्यव्यवस्था व नैतिकतेच्या पातळीवर स्वयंविचार करणे हीच माणसाची ओळख बनावी. स्वतःच्या अस्तित्वाचा अर्थ त्याने लावावा. कळपांचे भाग न बनता. परिसराचे निरीक्षण व स्वतःची निवडक्षमता विकसित करून सकारात्मकतेने जीवनाकडे पहावे. व्यसनी व्यक्तीकडे आजाराला बळी पडू नये म्हणून आत्मबळ हवे."

मुलाखतीत पुढे बोलताना त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाकडून शाश्वत जीवनमूल्यांचे अनुसरून व्हावे, अतिरेकी स्वातंत्र्य व अतिबंधने माणसाला व्यसनात बुडवतात. म्हणून मनाचा दुबळेपणा घालवण्याचे कोणते स्वास्थ्यपूर्ण मार्ग उपलब्ध होत आहेत का? हे पहावे जीवनात प्रत्येकाला यशाच्या मागे धावायचे असते. यशामध्ये हुरळून न जाता सर्वांपेक्षा वेगळे बनावे. ही अशी विद्यार्थी वर्गाची मानसिकता घडविण्यामध्ये सामाजिक संस्था, शिक्षणसंस्था, आपला परिसर, भोवताल खूप महत्त्वाचा आहे. अंमलीपदार्थांचे सेवनापासून स्वतःला वाचविण्यास जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याचे उपाय आपण शोधले पाहिजेत.

अशा रीतीने कोरोनाकाळात आरोग्याची गुरुकिल्ली देणारे व व्यायामाचे व्यसन करण्यास सांगणारे हे व्याख्यान सर्वांनाच लाभदायक ठरले. महाविद्यालयातील ४८६ विद्यार्थी प्राध्यापक व शिक्षकेतर सेवकांनी या मार्गदर्शनपर व्याख्यानाचा लाभ घेतला.

मा. प्राचार्यांना -
माहितीसाठी अहवाल सादर

तु.च.कॉलेज,बारामती
आवक नंबर: 51-96
दिनांक 17 AUG 2021

Estd-June 1962

।। सिध्दिरनेकान्तात्।।

Anekant Education Society's

# TULJARAM CHATURCHAND COLLEGE

of Arts, Science and Commerce, Baramati, 413102

(Autonomous Institute)

College with excellence at par

Dr. Chandrashekhar V. Murumkar
PRINCIPAL
Life Time Achievement Awardee

E-mail :- principal@tccollege.org, principal.tccollege@gmail.com
Website : www.tccollege.org
☎: (02112) 222405, 223635 Fax : (02112) 222728

| Religious Minority Institute | NAAC Reaccredited 'A+', CGPA 3.55 | |
|---|---|---|
| • ISO - 9001 - 2015 Certified | • Green Audit Certified | • Best College Awardee-SPPU |
| • DST FIST 'O' Level | • UGC - CPE Status | • Best Principal Awardee-SPPU |
| • DBT - Star College Scheme | • UGC - B. Voc. Programme | |

Affiliated to Savitribai Phule Pune University (Formerly University of Pune) (Id No.PU/PN/ASC/016/1962) Univ. College Code No. 032, HSC Board Code No.J 11.02.001(1976-77)

Ref. No. AES/TCC/ Gen.163 Date 21 AUG 2021

प्रति,

मा. स्नेहा सुभेदार,
अध्यक्ष,
RID 3131 & रोटरी क्लब ऑफ पुणे

सस्नेह नमस्कार,

महोदया,

दि. २९ जुलै २०२१ रोजी RID 3131 & रोटरी क्लब ऑफ पुणे मेट्रो व तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'SAY NO बोलो ना वेबिनार सेरीज एपिसोड नं. ८ मध्ये 'मनोरंजनविश्व आणि व्यसनाधीनता' या विषयावर श्री. गिरीश कुलकर्णी व श्री. चंद्रशेखर फणसाळकर यांच्या मुलाखतीतील संवादात्मक व्याख्यानाचे आयोजन करण्याची संधी आपल्यासोबत आमच्या महाविद्यालयाला मिळाली त्याबद्दल मनःपूर्वक आभार.

आमच्या महाविद्यालयातील अनेक विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या व्याख्यानाचा लाभ घेतला. व्यसनांना नकार देणे, व्यसनांपासून दूर राहणे हे फार महत्वाचे आहे. जीवनाकडे सकारात्मकतेने पाहायला शिकविणारे व मनाचा दुबळेपणा घालवण्याचे विधायक व सक्षम पर्याय शोधायला शिकविणारे हे प्रबोधनात्मक व प्रोत्साहनपर व्याख्यान सर्वच घटकांना लाभदायक ठरले. या व्याख्यानाचे आयोजन करण्याची दुर्लभ संधी आपण उपलब्ध करून दिलीत त्याबद्दल महाविद्यालय आपले पुनश्च आभारी आहे.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय,
बारामती